# दुसऱ्या महायुद्धातील धुरंधर व्यक्ती आणि कथा


लेखक

**डॉ. श्रीकांत मुंदरगी**



**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

A151

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

दुसऱ्या महायुद्धातील धुरंधर : डॉ. श्रीकांत मुंदरगी
व्यक्ती आणि कथा
© सुरक्षित

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
नोव्हेंबर, २०१३

**किंमत**
₹ ३१०/-

# दुसऱ्या महायुद्धातील
# धुरंधर व्यक्ती
# आणि कथा

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | हिटलरची अखेर आणि त्याच्या जीवनातील स्त्रिया | ५ |
| २. | हिटलरचं भंगलेलं स्वप्नं | २८ |
| ३. | मुसोलिनीची सुटका | ५२ |
| ४. | साठ लाख ज्यूंचा कर्दनकाळ–ॲडॉल्फ आईशमन | ७३ |
| ५. | लाखो प्राण वाचवणारा महामानव–डॉ. क्रेस्टन | ९४ |
| ६. | इंटरपोल | १३३ |
| ७. | प्रलयंकारी हत्यारं – अण्वस्त्रं | १५९ |
| ८. | पोलीश कँप | १८५ |


✦✦

# १. हिटलरची अखेर आणि त्याच्या जीवनातील स्त्रिया

हिटलर हे नियतीनं पृथ्वीवर पाठवलेलं एक अजब व्यक्तिमत्त्व होतं. त्या व्यक्तिमत्त्वाचं आकर्षण आजही जगातल्या लोकांना तितकंच आहे, जितकं ते पाऊण शतकापूर्वी जर्मन जनतेला होतं. हिटरलच्या सर्व खेळी अचूक ठरल्या असत्या तर जगज्जेत्या सिकंदर आणि शूरवीर नेपोलियनलाही त्यानं मागं सारलं असतं. पण तसं झालं नाही हे जगाचं सुदैवच म्हणायला हवं.

हिटलरनं कसलंही लष्करी शिक्षण घेतलं नव्हतं. तो पहिल्या महायुद्धात लष्करात भरती झाला तो रनर म्हणून सेनाधिकाऱ्यांचे संदेश परस्परांना वा सैन्याला पोहोचवण्याचं काम त्याच्यावर सोपवण्यात आलं होतं. या कामातही त्यानं आपल्या बुद्धीची चमक दाखवली आणि वरिष्ठांना चकित करून सोडलं. असं असलं तरी हातात बंदूक घेऊन लढण्याची वेळ त्याच्यावर क्वचितच आली असेल. याचाच अर्थ त्याचा रणांगणावरचा अनुभव तसा नगण्यच म्हणावा लागेल. असं असूनही त्यानं दुसऱ्या महायुद्धात घेतलेले रणभूमीवरचे अनेक निर्णय जगभरातल्या निष्णात सेनानींनासुद्धा थक्क करून टाकणारे ठरले.

''दोन आघाड्यांवर लढणं हा शुद्ध वेडेपणा आहे.'' असं आपल्या 'माईन क्राम्फ' या चरित्रात लिहून ठेवणाऱ्या हिटलरनं पश्चिमेकडं लढाई चालू असताना रशियाविरुद्ध युद्ध का सुरू केलं? ही एक युद्धतज्ज्ञांनाही स्तंभित करून टाकणारी गोष्ट ठरली. पण त्याच्या विनाशाचा प्रारंभ या दुसऱ्या आघाडीपासून झाला, हे शेवटी त्यानंही मान्य केलं होतं. कम्युनिस्टांविषयी वाटणारा अतीव द्वेषच या

गोष्टीला कारणीभूत ठरला असावा. तोंडावर गोड बोलणारा स्टॅलिन पाठीत केव्हातरी खंजीर खुपसल्याशिवाय राहणार नाही म्हणून त्याला ती संधी देण्यापेक्षा आपणच त्याचा निकाल लावून टाकूया, असं हिटरल आपल्या सहकाऱ्यांना नेहमी म्हणायचा. बचावापेक्षा आक्रमण नेहमीच प्रभावशाली ठरतं.

पहिलं महायुद्ध संपलं. दोस्त राष्ट्रांनी जर्मनीवर अत्यंत जाचक अटी लाटून त्या देशाला सर्वार्थानं हतबल करून टाकलं होतं. युद्धात पराभव झालेल्या जर्मनीची अवस्था नेत्यांनी अत्यंत हीन-दीन करून टाकली होती. कारण अपयश नेहमीच पोरकं असतं.

१० नोव्हेंबर १९१८ हा दिवस हिटलरच्या आयुष्यातला अत्यंत दुःखद दिवस होता. ब्रिटिशांनी केलेल्या वायुहल्ल्यात हिटलरला तात्पुरतं अंधत्व आलं होतं म्हणून तो पासेवॉक या गावातील लष्करी रुग्णालयात उपाचार करून घेत होता.

जर्मनीनं शरणागती पत्करली आणि कैसर राज्यत्याग करून हॉलंडला पळून गेला. ही बातमी ऐकताच हिटलर लहान मुलासारखा घळाघळा रडला. आपण कायमचे आंधळे झालो तर बरं, असं त्याला वाटलं. परमेश्वरानं त्याची ही इच्छा पूर्ण केली असती तर जग महाभयंकर विनाशकारी अशा दुसऱ्या महायुद्धापासून वाचलं असतं. पण तसं होणं नव्हतं. माणसं इतिहास शिकतात. पण इतिहास शिकल्यामुळे शहाणे होणारे फार थोडे.

हिटलरनं अविश्वसनीय अशा आत्मिक सिद्धीच्या बळावर जर्मनीला अल्पावधीतच भौतिक सिद्धी मिळवून दिली. त्याच्या अफाट इच्छाशक्तीमुळं एका जवळजवळ संपलेल्या देशाला केवळ पाच वर्षांत त्यानं एक सामर्थ्यशाली राष्ट्र बनवलं. जर्मन देशाची अस्मिता त्यानं जागी केली. हिटलरच्या या महान कार्याची तुलना अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रुझवेल्ट यांच्या कार्यपद्धतीशी केली जाते. १९२९ साली अमेरिकेला मंदीच्या लाटेतून सावरून तिला जगातलं सर्वाधिक संपन्न राष्ट्र बनवण्याचं श्रेय रुझवेल्टना दिलं जातं. गमतीची गोष्ट अशी की, हिटलर आणि रुझवेल्ट दोघांनीही अर्थशास्त्राचा यत्किंचितही अभ्यास केला नव्हता. जागतिक कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ केनेथ गॉलब्रेथ म्हणतात की, अर्थशास्त्र हे एक गहन आणि गंभीर शास्त्र आहे. तिच्या निष्ठावंत अभ्यासकांना जगातल्या अर्थसमस्या कधीही नीट सोडवता आल्या नाहीत. याउलट अर्थशास्त्राचा गंध

नसलेल्या हिटलर आणि रुझवेल्ट यांनी अर्थशास्त्रातले सर्वात मोठे चमत्कार करून दाखवलेत.

जॉर्ज बर्नाड शॉसारखा महान विचारवंत म्हणतो, हिटलर हे नियतीला पडलेलं १९ व्या शतकातलं सर्वात वाईट स्वप्न असलं तरीही त्या स्वप्नाला अनाकलनीय गूढरस्य झालर आहे, हे इतिहासालासुद्धा नाकारता येणार नाही.

सर ओसवॉल्ड मोस्ले या राजकीय तज्ज्ञानं हिटलरच्या तुफानी सेनेच्या धर्तीवर ब्रिटिश युनियन ऑफ फॅसिस्ट या नावाची संघटना काढली तर कर्नल फ्रँका रोख यानं 'क्रोद फू' ही फ्रेंच संघटना निर्माण केली. बेल्जियममध्ये लिआँ दे ग्रेल यानं हिटलरचा आदर्श समोर ठेवून बेल्जियमला बलिष्ठ करण्याचा ध्यास घेतला. त्यावेळचा चीनचा अध्यक्ष चँग कै शेक म्हणाला, हिटलरची ध्येयधोरणंच देशाला सामर्थ्यसंपन्न बनवू शकतात. आजमितीलाही हिटलरचे हजारो भक्त जगभर पसरले आहेत.

एक काळ असा होता की, तीन चतुर्थांश जग हिटलरच्या प्रेमात पडलं होतं. प्रख्यात अमेरिकन लेखिका गर्ट्र्युड स्टेननं १९३६ साली नोबेल शांतता पुरस्कारासाठी हिटलरचं नाव सुचवलं होतं आणि इतर दोन नावांबरोबर या नावाचाही गंभीरपणे विचार करण्यात आला होता, या विरोधाभासाला काय म्हणावं!

हिटलरपाशी अनेक गुण होते. पण कम्युनिस्ट आणि ज्यू धर्मियांच्या द्वेषानं त्याचे सारे सद्गुण झाकोळून गेले. त्यानं दुसरं महायुद्ध सुरू केलं नसतं तर जर्मनी ही अमेरिका आणि रशियाच्या खांद्याला खांदा लावून उभी राहणारी तिसरी महाशक्ती ठरली असती. पण दुर्दैवानं तसं होणं नव्हतं. दोन महायुद्धांना जर्मन देश कारणीभूत ठरला. जर्मनीत पुन्हा एखादा हिटलर जन्माला येऊ नये, अशी काळजी देव आणि दैवापेक्षाही जर्मनी जनतेनंच घ्यायला हवी. अन्यथा तिसऱ्या महायुद्धाला कारणीभूतही जर्मनीच ठरू शकेल.

ऑस्ट्रियातील एका लहानशा गावात जन्मलेल्या या पोरानं जर्मनीचा भाग्यविधाता होण्यापर्यंत कशी काय मजल मारली? ही सारी कहाणी एखाद्या काल्पनिक कादंबरीपेक्षाही रोमहर्षक आहे. हिटलरला ना पूर्वजांची प्रतिष्ठा होती, ना संपत्ती वा सत्तेचं पाठबळ! बुद्धिमान म्हणावा तर त्याचं शिक्षणही यथातथाच. समोरच्या माणसावर छाप पडावी असं जगावेगळं व्यक्तिमत्त्व वा रुबाबदारपणाही त्याला लाभला नव्हता. अशा अनेक उणिवांवर मात करून त्यानं इतकी उंची

कशी गाठली आणि त्या सर्वोच्च स्थानावर पोहोचल्यानंतर साऱ्या जगाला त्यानं आश्चर्याचे आणि भयभीतीचे धक्क्यामागून धक्के दिले. म्हणूनच असेल कदाचित जगातील अनेक भाषांतून त्याच्यावर लक्षावधी पुस्तकं लिहिली गेली. अशा या असामान्य, अद्वितीय आणि अद्भुत पण जगाला थरकापून सोडणाऱ्या शूर माणसाच्या जीवनाचा अखेरचा काळ आणि त्याच्या जीवनात आलेल्या स्त्रिया, यांचा मागोवा घेणं हे खचितच बुद्धीला चालना देणारं ठरेल.

## विनाशकाले विपरीत बुद्धी

ॲडॉल्फ हिटलर... मानवजातीला पडलेलं एक क्रूर आणि कराल स्वप्न! हजारो वर्षांच्या इतिहासात असा माणूस झाला नसेल. चेंगीझखान हा एक भयानक राक्षसी माणूस होता. त्यानं ज्या ज्या देशांवर चढाई केली ते सारे देश रक्ताच्या पाटांत न्हाऊन निघाले. त्याच्या क्रौर्यानं थिजून गेले. हिटलरनं क्रूरपणाच्या बाबतीत चेंगीझखानलाही मागं टाकलं. सिकंदर आणि नेपोलियन दोघंही अत्यंत शूर लढवय्ये होते. त्यांच्या शौर्यापुढं जगातले अनेक देश नतमस्तक झाले. त्या दोघांनी अल्पावधीत जगाच्या बऱ्याच मोठ्या भूभागावर आपलं स्वामित्व प्रस्थापित केलं. पण त्याहीपेक्षा कमी वेळात हिटलरनं जगाचा कितीतरी अधिक भूभाग संपादित केला. त्यावर आपलं प्रभुत्व गाजवलं. असा हा हिटलर म्हणजे एक अफलातून व्यक्तिमत्त्व. या व्यक्तिमत्त्वाभोवती जितकं गूढ रम्यतेचं वलय निर्माण झालं आहे, तितकं मानवजातीच्या इतिहासात अन्य कोणत्याही व्यक्तीच्या वाट्याला आलेलं नाही.

२० व्या शतकातील सर्वात महत्त्वाची घटना कोणती? या प्रश्नाचं उत्तर कुणीही दुसरं महायुद्ध असंच देईल. याबद्दल दुमतही असणार नाही. या महायुद्धाबद्दल जितकी चर्चा झालीय, जितका ऊहापोह झालाय, जितके वादविवाद झालेत, जितकी पुस्तकं लिहिली गेलीत आणि जितके लघुपट तसंच चित्रपट निर्माण झालेत, तितकं अन्य कोणत्याही घटनेच्या वाट्याला आलेलं नाही. अशा या महायुद्धाचा नायक अथवा खलनायक ही बिरुदावली फक्त हिटलरच्याच वाट्याला येते. अशा या लोकविलक्षण माणसाचा शेवट कसा झाला याची नेमकी कल्पना फारच थोड्या लोकांना असेल. तसंच जीवनात आलेल्या स्त्रियांविषयी फारच थोही माहिती सर्वसामान्य वाचकांना आहे. या दोन्हीवर

प्रकाश टाकून वाचकांच्या उत्सुकतेचं थोडंफार निरसन करणं हा या लेखामागचा हेतू आहे.

१९४५ साल उजाडलं. विजयामागून विजय मिळवत गेलेल्या जर्मनीच्या सेनेला सर्वच रक्षक्षेत्रांवर पराभवाचे दणके बसू लागले होते. भरधाव वेगानं शत्रप्रदेशात मुसंडी मारणाऱ्या पँझर तुकड्यांची सर्वत्र पीछेहाट होऊ लागली होती. जर्मन रणगाड्यांची चाकं रशियातल्या चिखलात रुतून पडली होती आणि जर्मन सैनिक रशियाच्या कडाक्याच्या थंडी-पावसात गारठून गोठून मरू घातले होते. दोस्त राष्ट्रांच्या सेना नॉर्मंडीतून जर्मनीवर चारी दिशांनी आक्रमण करू लागल्या होत्या. अमेरिकेची विमानं आकाशातून बर्लिनवर बाँबवर्षाव करून जर्मनीची राजधानी भाजून काढत होती. त्यांना प्रतिकार करणारी लुफ्तवाटची जर्मन विमानं बहुतांशी नष्ट झाली होती आणि जी शिल्लक होती ती उडण्याच्या अवस्थेत नव्हती. चांगल्या अवस्थेत जी विमानं होती ती उडवायला वैमानिकच शिल्लक नव्हते. जर्मनीतल्या तरुण पिढीची युद्धात आहुती पडली होती. साठ लाख जर्मन सैनिकांपैकी तीस ते चाळीस लाख सैनिक मारले गेले होते. दहा-पंधरा लाख युद्धकैदी झाले होते आणि उरलेले पाच लाख जमेल त्या शस्त्रानं, जमेल त्या पद्धतीनं शत्रूचा प्रतिकार करत होते. बारा ते पंधरा वर्षांची मिसरूडही न फुटलेली कोवळी मुलं आणि पन्नाशी-साठी ओलांडलेले म्हातारे हातात बंदुका घेऊन लढत होते. त्यांना ना युद्धाची समज होती ना कसलं लष्करी शिक्षण होतं.

आणि हिटलर रेडिओवरून आपल्या गलितगात्र जनतेला संदेश देत होता.

...अंतिम विजय आपलाच आहे, आपल्या युद्धसामग्री निर्माण करणाऱ्या कारखान्यात व्ही वन आणि व्ही टू रॉकेटस् तयार झाली आहेत. ती शत्रूचा नायनाट करतील...

भाबडी प्रजा त्या शब्दावर विश्वास ठेवत होती. त्यांचा आपल्या नेत्यावर प्रगाढ विश्वास होता. हिटलर नमेद आणि निराश झालेल्या आपल्या सेनाधिकाऱ्यांना सांगत होता...

काळजी करू नका. जेट विमानं तयार होत आहेत. अणुबाँब तयार व्हायला फक्त काही महिन्यांचाच अवधी आहे. आपली जेट विमानं इंग्लंड- अमेरिकेपर्यंत जाऊन त्यांचे प्रदेश बेचिराख करतील आणि मग शत्रूला आपल्यापुढं नाक घासत शरण येण्यावाचून पर्याय राहणार नाही...

पण जर्मन सेनाधिकारी हे जाणून होते की, आपला नेता जे सांगतोय त्यात काडीइतकंही सत्य नाही. हे तर शब्दांचे ताबूत आहेत, कल्पनेचे फुगे आहेत, भ्रमाचे भोपळे आहेत. सेनाधिकाऱ्यांना हे कळत नव्हतं की, रशियन तोफांचे गोळे बर्लिनवर फुटत असताना आणि अमेरिका इंग्लंडची विमानं आकाशातून बर्लिनला भाजून काढत असताना स्वप्नांच्या दुनियेत वावरणाऱ्या आपल्या या अहंमन्य आणि मूर्ख नेत्याला कोणत्या शब्दात सांगावं की बाबा रे, जर्मनीचा सर्वनाश होण्याआधी शत्रूंशी वाटाघाटी कर आणि या महाविध्वंसक युद्धाला पूर्णविराम दे.

ॲडॉल्फ हिटलर सेनाधिकारी समजत होता तेवढा मूर्ख निश्चितच नव्हता. फक्त अहंमन्य होता. पराभव अटळ आहे, हे त्यानं मनोमनी मान्य केलं होतं. सुंभ जळला तरी पीळ जळत नव्हता हेच खरं! मोडेन पण वाकणार नाही ही त्याची जिद्द! शरणागती पत्करण्यापेक्षा रणांगणात मरण पत्करणं बरं, अशी त्याची धारणा होती. तो कुणाला तहाचं नाव काढू देत नव्हता. शरणागती हा शब्दसुद्धा त्याला विषासमान वाटत होता. जर्मनीतला अखेरचा माणूस पडेपर्यंत शस्त्र खाली ठेवायचं नाही ही त्याची आज्ञा होती. हिटलरनं युद्ध सुरू केलं आणि युरोपातले देशामागून देश पादाक्रांत केले. इंग्लंडवर विमानं धाडून, ते पूर्ण नष्ट होईपर्यंत भाजून काढा असा त्यानं आदेश दिला होता. त्यावेळी इंग्लंड दाती तृण धरून शरण येईल असं त्याला वाटत होतं. पण विन्स्टन चर्चिलनं बाणेदार उत्तर दिलं... युद्ध केव्हा सुरू करायचं ते तुम्ही ठरवलंत, आता ते केव्हा थांबवायचं ते आम्ही पाहू. तुमचा संपूर्ण पराभव होईपर्यंत हे युद्ध चालूच राहील... हिटलरनं चर्चिलला मूर्खात काढलं होतं, विनाशाची वेळ आली की माणूस बुद्धिभ्रष्ट होतो. वास्तविक वस्तुस्थिती बरोबर उलट आहे.

हिटलर स्वत:ला जगज्जेता समजत होता. पण विन्स्टन चर्चिल दूरदृष्टीचा नेता होता. चर्चिल जगाला विनाशापासून वाचवू पाहात होता. हिटलर चर्चिलचा आत्यंतिक तिरस्कार करत होता. तो म्हणायचा, 'हा मूर्ख माणूस आपल्या देशाला युद्धाच्या खाईत लोटून त्याचं वाटोळं करतो आहे'; तर चर्चिलनं उद्गार काढले होते, 'हिटलरचे लाख दुर्गुण असतील, पण इतक्या अल्पावधीत त्यानं आपल्या दुबळ्या आणि शक्तिहीन देशाचं बलाढ्य राष्ट्रात केलेलं रूपांतर लाख मोलाचं आहे.'